**मे. श्री दुधंगगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, बिद्री (मौनी नगर), ता. कागल, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ५००० टीसीडी वरुन १०००० टीसीडी विस्तारीकरण करणे व मळीवर आधारीत ७५ किलोलिटर प्रतिदिन नवीन आसवणी प्रकल्प उभारणी या दोन प्रस्तावित प्रकल्पांकरिता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ५००० टीसीडी वरुन १०००० टीसीडी विस्तारीकरण करणे आणि मळीवर आधारीत ७५ किलोलिटर प्रतिदिन नवीन आसवणी प्रकल्प उभारणे या दोन प्रस्तावित प्रकल्पांकरिता पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बुधवार दि. ०६-११-२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता मे. श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर येथे कारखाना कार्यस्थळावर घेण्यात आली.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :-

१. मा. श्री. भाऊसाहेब गलांडे - अध्यक्ष
अपर जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर
(मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी)

२. श्री. रविंद्र आंधळे - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर
(म.प्र.नि. मंडळाचे प्रतिनिधी)

३. श्री. प्रशांत गायकवाड,
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, - समन्वयक
कोल्हापूर.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सर्वप्रथम श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा जनसुनावणीचे समन्वयक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी सांगितले की, भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांच्या पर्यावरण आघात मुल्याकंन अधिसूचना २००६ व त्यातील सुधारणा अन्वये प्रस्तावित प्रकल्प 'अ' प्रवर्गामध्ये येत असल्याने आजची जनसुनावणी घेण्यात येत आहे. यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला होता. त्यांना भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांनी काही अटी व शर्ती घालून टी.ओ.आर. मंजूर केलेला आहे व प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती दिलेली आहे. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल

तयार करुन शासनास सादर केलेला आहे. त्यानंतर मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी सदर जनसुनावणी घेण्यास मान्यता दिली व त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०५-१०-२०१९ रोजीच्या दै. "पुढारी" या मराठी व "टाईम्स ऑफ इंडिया" या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना प्रसिध्द केलेली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेला प्रारुप पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर; जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर; जिल्हा परिषद, कोल्हापूर, मा. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय, मुंबई; प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ कोल्हापूर; प्रांत अधिकारी कार्यालय कागल, तहसिल कार्यालय, कागल; गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय कागल; ग्रामपंचायत कार्यालय, बिद्री, ता. कागल इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या व जनतेकडून प्रस्तावित प्रकल्पाबाबत हरकती, आक्षेप सूचना मागविण्यात आलेल्या होत्या. प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनतेच्या सूचना, टिका, प्रश्न असतील तर आपण लेखी किंवा तोंडी स्वरुपात मांडाव्यात त्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेतली जाईल. प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात म.प्र.नि. मंडळाकडे पाच हरकती प्राप्त झालेल्या आहेत. ही पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती केवळ जनतेच्या पर्यावरण विषयक तक्रारी, सूचना यांची नोंद घेणार असून प्रकल्प उभारणीबाबत कोणताही निर्णय ही समिती घेणार नाही. या जनसुनावणीचा उद्देश जनतेस प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या ऊपाययोजना तसेच जनतेच्या टिका, सूचनांची नोंद घेवून त्याचे इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांचेकडे पुढील निर्णय घेणेसाठी सादर करणे हा आहे असे सांगून श्री. प्रशांत गायकवाड यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती सादर करण्याची सूचना केली.

यानंतर प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार डॉ. संग्राम घुगरे, मे. इक्विनॉक्स एन्व्हायरनमेंट्स (इं.) प्रा. लि. यांनी स्लाईड शोव्दारे प्रस्तावित प्रकल्पांबाबत माहिती सादर केली. त्यांनी सांगितले की, मे. इक्विनॉक्स एन्व्हायरनमेंट्स (इं.) प्रा. लि. ही भारत सरकारव्दारे मानांकित संस्था असून प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार म्हणून काम पाहते. त्यांनी नमूद केले की, प्रकल्पाचे स्थळ राधानगरी अभयारण्यापासून १० कि.मी. हवाई अंतराबाहेर आहे, त्यामुळे प्रकल्पास राष्ट्रीय वन्यजीव मंडळ, नवी दिल्ली (NBWL) कडून मंजूरी घेण्याची गरज नाही. राधानगरी अभयारण्याचे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (ESZ) प्रकल्प स्थळापासून ५ कि.मी. पेक्षा कमी अंतरामध्ये असल्याने पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ अनुसार प्रस्तावित प्रकल्प 'अ' श्रेणीमध्ये येतो तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास क्षेत्राच्या १० कि.मी. त्रिज्या क्षेत्रामध्ये राधानगरी अभयारण्याचे कोणतेही गाव येत नाही. यावेळी श्री. घुगरे यांनी प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, उपग्रह छायाचित्र, सहवीज प्रकल्पाच्या बॉयलरमध्ये केलेल्या सुधारणा, प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणीय दृष्टीकोनातून स्थिती, एकत्रीत प्रकल्पाची माहिती, विस्तारीत व नविन प्रकल्पांची वैशिष्टे, प्रकल्प प्रवर्तक, उत्पादने व जोड उत्पादने, कच्चा माल, साखर, सहवीज व आसवणी उत्पादन प्रक्रिया; साखर व सहवीज प्रकल्पासाठी पाण्याचा वापर, साखर व सहवीज प्रकल्पातून सध्या निघणारे सांडपाणी व प्रस्तावित विस्तारीकरणानंतर निघणारे सांडपाणी, आसवणी प्रकल्पासाठी पाण्याचा वापर व तयार होणारे सांडपाणी, साखर कारखान्याचा प्रस्तावित घरगुती सांडपाणी प्रकल्प व औद्योगिक सांडपाणी प्रकल्प, साखर कारखाना व आसवणी प्रकल्पांचे प्रस्तावित कन्डेन्सींग पॉलिशिंग युनिट, प्रदूषणाचे स्त्रोत, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा, हरित पट्टा विकास कार्यक्रम व त्या अंतर्गत एकूण क्षेत्र, रेनवॉटर हार्वेस्टींग, सामाजिक व आर्थिक विकासापोटी

केलेला खर्च, नियोजित सामाजिक व आर्थिक विकास कार्यक्रम, प्रकल्पामधील पर्यावरणीय घटकासाठीच्या गुंतवणुकीचा तपशिल, भांडवली गुंतवणूक व देखभाल, पर्यावरणीय तपासणी कार्यक्रमादरम्यान डिसेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ कालावधीमधील परिक्षण, सॅटेलाईट मॅप, टोपोग्राफी मॅप, जमिन वापर, जैवविविधता, हॅबीटॅट, सी.आर.ई.पी मानके इ. बाबत सविस्तर माहिती दिली.

वरील सादरीकरणानंतर नागरीकांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत प्रस्तावित प्रकल्पाचे व्यवस्थापन / पर्यावरण विषयक सल्लागार यांनी खालीलप्रमाणे उत्तरे दिली / म्हणणे मांडले.

**प्रश्न क्र. १. श्री. एकनाथ चव्हाण, गाव बोरवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

सादरीकरणामध्ये चांगली माहिती दिलेली आहे त्यामुळे माझ्या शंका दूर झाल्या आहेत. तरीसुध्दा मला दोन – तीन प्रश्न विचारायचे आहेत. प्रस्तावित विस्तारीकरणानंतर साखर कारखान्याची गाळप क्षमता / साखर किती होईल ? प्रस्तावित आसवणी प्रकल्पातून किती अल्कोहोल निर्मिती होईल ? या दोन्ही प्रकल्पांना एकूण किती खर्च येणार ?

**उत्तर -**

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरणविषयक सल्लागार यांनी सांगितले की, साखर उत्पादन कमी करुन अल्कोहोलचे जास्त उत्पादन केले जाईल. एक टन मळीपासून २३० लिटर अल्कोहोल तयार होईल. साखर उतारा कमी होईल पण अल्कोहोलला जास्त दर आल्यामुळे आर्थिक फायदा होईल. केन जूस पासून अल्कोहोल निर्मिती होईल. त्यामुळे मळी मिळण्यासाठी कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही.

**प्रश्न क्र. २. श्री. आण्णासो पोवार, गाव बिद्री, ता कागल, जि. कोल्हापूर.**

मी स्थानिक भूमिपुत्र आहे. आपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने माहिती दाखविली. आपण सहवीज प्रकल्पाच्या वेळी असेच मुद्दे मांडले होते. आपले प्रकल्प नागरी वस्तीच्या जवळ येतात. सहवीज प्रकल्पाच्या बगॅस मुळे प्रदूषण होते त्याबाबत आम्ही कारखान्याचे एम.डी. यांच्याकडे तक्रार केली होती त्यावेळी आपण पत्रे लावून त्यांचे प्रदूषण थांबविले. आपण आता सादरीकरण केले पण त्यावर ठोस ऊपाययाजना म्हणून खास करुन बिद्री, बोरवडे, सोनाळी इ. चार पाच गावांमध्ये स्वतंत्र उपाययोजना करावी. आमचा प्रस्तावित प्रकल्पाला विरोध नाही पण त्यामुळे भुमीपुत्रांना त्याचा त्रास होऊ नये. काल दुपारी कारखान्यामुळे आवाजाचे प्रदूषण होत असल्याबाबत मी श्री. सणगर साहेब यांना कळविले. कारखान्यामुळे आवाजाचे, हवेचे प्रदूषण होते. त्यामुळे आपण आमच्या गावांसाठी काही स्वतंत्र उपाययोजना केली आहे काय ?

**उत्तर -**

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागारांनी सांगितले की, आपल्याला झालेला त्रास हा सध्या चालू असलेल्या प्रकल्पांमुळे झालेला आहे. या प्रकारच्या तक्रारीसाठी

कारखान्यामध्ये एन्वायरनमेंट मॅनेजमेंट सेल केला जाईल. एकूण १० लोकांची एक समिती स्थापन केली जाईल व या समितीचा मी अध्यक्ष असेन. येथून पुढे सिंगल विंडो ऑपरेशन असते तसा एन्वायरनमेंट मॅनेजमेंट सेल असेल तेथे आपण तक्रार द्यावी, तक्रारींचा संग्रह करुन ज्या उपाययोजना करायच्या त्या नक्की करु.

**प्रश्न क्र. ३. श्री. भिकाजी पाटील, सदस्य, ग्रामपंचायत बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर आणि ऊस उत्पादक सभासद.**

कारखान्यापासून होणारे प्रदूषण हा आमच्या गावासाठी संवेदनशील विषय आहे व यावर चर्चा करणे गरजेचे आहे. कारखान्याचे सर्व सांडपाणी एकत्र करुन त्यावर प्रक्रिया करुन ते बाहेर सोडले पाहिजे. परंतु आता सध्या जर कारखान्याची परिस्थिती बघीतली तर एकूण सांडपाण्याच्या ५० टक्केच सांडपाणी हे औद्योगिक सांडपाणी केंद्रापर्यंत जाते, त्यावर प्रक्रिया होतेच असे मी म्हणत नाही. बाकीचे ५० टक्के सांडपाणी विविध मार्गाने थेट ओढ्यातून नदीपात्रात जाते. कारखान्याचे सांडपाणी थेट नदीत गेल्यामुळे जैवविविधता धोक्यात आलेली आहे, नदीच्या आजुबाजुला राहणा-या लोकांच्या आरोग्यावर फार मोठा परिणाम झालेला आहे, नदीच्या पाण्यामुळे जमिनी व ऊस पिकांवर परिणाम झालेला आहे. आतापर्यंत लोकांनी वेळोवेळी आंदोलने केली परंतु कारखान्याने त्याची दखल घेतली नाही. ग्रामपंचायतीनेसुध्दा याबाबत वेळोवेळी निवेदने दिली पण कारखान्याने त्याची दखल घेतली नाही व काहीही कार्यवाही केली नाही. माझे असे म्हणणे आहे की, जे ५० टक्के पाणी औद्योगिक सांडपाणी केंद्रापर्यंत जाते त्यावरसुध्दा व्यवस्थित प्रक्रिया केली जात नाही. आमचे असे म्हणणे आहे की, आपण जे सादरीकरण केले व ऊपाययोजना सूचविल्या त्या आपण प्रथम अंमलात आणून दाखवा पाणी शुध्द करुन दाखवा व त्यानंतर आम्ही पुढील प्रकल्पाला पाठींबा देतो. याच्यावर आपले मत मांडावे.

<u>उत्तर -</u>

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सांगितले की, साखर कारखान्यासाठी भरपूर पाणी लागते व तो वॉटर ईटेन्सीव्ह असतो. अशा उद्योगामध्ये मूळ स्त्रोत जिथे आहे तिथेच सांडपाणी बंद केले पाहिजे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये पाण्याचे प्रमाण कमी करण्याचे नियोजन केलेले आहे व त्यासाठी दोन कोटी रुपयांची गुंतवणूकीची तरतूद केलेली आहे. जुन्या प्रकल्पामुळे आपणांस त्रास झालेला आहे पण प्रस्तावित प्रकल्पामध्ये आम्ही सुधारणा करणार आहे व त्यासाठी आम्हाला एक संधी द्यावी. वेळोवेळी सर्व मॉनिटरींग केले जाईल. सर्व पर्यावरणाच्या प्रदूषणाच्या घटकांवर आम्ही टप्प्याटप्याने नियंत्रण करणार आहोत. आम्हाला एक वर्षाचा कालावधी द्या या एक वर्षामध्ये आम्ही सर्व यंत्रणा ऊभारणार आहे. हे या हंगामात होणार नाही परंतु पुढील हंगामात होईल. आपणांस वैयक्तिक माहिती हवी असल्यास सर्व योजना समजावून सांगितली जाईल.

यावर श्री. भिकाजी पाटील यांनी सांगितले की, आपण सांगितल्याप्रमाणे तुम्हाला वेळोवेळी संधी देऊनसुध्दा प्रदुषणामध्ये काही फरक पडलेला नाही. परत संधी देण्यापेक्षा आहे हा उद्योग प्रदूषणमुक्त करा व त्यानंतर पुढील वाटचाल करावी.

यावेळी श्री. रवींद्र देसाई, कार्यकारी संचालक, मे. श्री दुधगंगा वेदगंगा स.सा.का.लि. यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केल्याप्रमाणे ऊपाययोजना केल्या जाईल असे सांगितले.

यावर श्री. भिकाजी पाटील यांनी सांगितले की, कार्यकारी संचालक आणि पर्यावरण विषयक सल्लागार यांनी ज्या ऊपाययोजना सूचविल्या त्याच्याशी आम्ही असहमत आहे. कारण त्या अशक्य कोटीतील गोष्टी आहेत व त्याचा आम्ही वेळोवेळी अनुभव घेतलेला आहे. सध्या चालू असलेला प्रकल्प अगोदर प्रदूषणमुक्त करा कारण हा आमच्या जिवन मरणाचा प्रश्न आहे. आम्ही कारखान्याच्या ६०० मिटर अंतरावर राहतो. आमच्या आयुष्यावर खूप मोठा परिणाम झालेला आहे. सध्या चालू असलेला प्रकल्प अगोदर प्रदूषणमुक्त करा व त्यानंतर विस्तारीकरण करा.

**प्रश्न क्र. ४. श्री. सुनिल मारुती पाटील, ऊस उत्पादक सभासद, गाव बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर**

मी आपल्याकडे लेखी तक्रार नोंद केलेली आहे माझा मुद्दा असा होता की माझे कारखान्याशेजारी वैयक्तिक क्षेत्र आहे त्याठिकाणी जलसिंचन आहे. ब-याच वेळा दिवसाचे नसेल पण रात्रीचे प्रदूषीत सांडपाणी सोडले जाते, व तेच पाणी ऊपसा होऊन माझ्या शेतीला जाते. माझे आर्थिक नुकसान तर होतेच पण तेच पाणी जनावरांना तसेच लोकांचा पिण्यासाठी दिले जाते. दुसरी गोष्ट, राखेच्या बाबतीत कारखाना कुठल्याही प्रकारची मोठी ऊपाययोजना करताना दिसत नाही. आजुबाजुच्या ५०० ते ६०० मिटर अंतरावर आम्ही राहतो. घरामध्ये सकाळ, दुपारी, संध्याकाळी झाडलोट केलयानंतर बुट्टीभरुन राख आपल्याला पाहायला मिळते. माझ्या मते पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी ही कारखान्याचा हंगाम चालू असताना झाली असती तर बरे झाले असते. त्यावेळी ख-या अर्थाने आवाजाची तिव्रता, राखेची घाण, हवेचे प्रदूषण, पाणी प्रदूषण, बगॅसचे प्रदूषण या सर्व गोष्टी आपणांस समोर दिसल्या असत्या. त्यामुळे माझ्यासारख्या शेतक-यांनी व्यथा सांगण्यापेक्षा आपण उघड्या डोळयाने ते पाहिले असते असे माझे मत आहे. आजुबाजुला बगॅसचे ढिग लावले जातात, जसा काश्मिरमध्ये बर्फ पडतो तसा येथे बगॅस पडतो. डोळ्यांना इजा होतातच, लहानमोठे अपघात होतातच, बरेच लोक जायबंदी, अपघाताने अधू झालेली आहेत, त्याच बरोबर आजुबाजुच्या भागातील गावांतील लोकांमध्ये श्वसनाचे मोठ्या प्रमाणावर विकार झालेले दिसून येतात. बोरवडे, बिद्री, फराकटेवाडी, वाळवे या गावातील लोकांना श्वसनाचे आजार झालेले आहेत, यावर फारशी ऊपाययोजना झाल्याचे दिसून येत नाही. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे भुमीहीन म्हणून आमच्या आजा-आजोबांनी त्या काळात लोकांना शाळा शिकायला मिळेल, त्यांचे कल्याण होईल म्हणून ७२ हे. जागा लोकांनी आपल्याला दिली. ख-या अर्थाने भूमीहिनांना येथे न्याय मिळत नाही. बिद्री व इतर गावांतील सर्व क्षेत्रातील लोकांना न्याय मिळावा, बिद्री गावातील कमीत कमी १० टक्के लोकांना प्रस्तावित प्रकल्पामध्ये कर्मचारी म्हणून घेण्यात यावे अशी मी सभासद व बिद्री गावचा सूज्ञ नागरीक म्हणून विनंती करीत आहे.

**प्रश्न क्र. ५. श्री. शहाजी पांडूरंग गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य, गाव बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

माझा असा प्रश्न आहे की, आपण एकीकडे माहिती सांगत असताना आसवणी हा अतिशय प्रदूषणकारी प्रकल्प आहे असे सांगितले. आपल्या आसवणीमध्ये किमान ८८ टक्के कच्चा माल कन्वर्ट केला जातो व सांडपाणी पाण्यामध्ये सोडले जाते असे आम्ही वाचले तसेच प्रतिलिटर

अल्कोहोल तयार करण्यासाठी ६ ते ८ लिटर स्पेंट वॉश निर्माण होईल असे आपण सांगितले पण मी म्हणतो की, प्रतिलिटर अल्कोहोल तयार करण्यासाठी १० ते १५ लिटर स्पेंट वॉश निर्माण होईल त्यामुळे आपला प्रकल्प कसा चांगला आहे हे आपण सांगत असला तरी मला त्याबद्दल शंका येते. माझी श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तसेच श्री. भाऊसाहेब गलांडे, अपर जिल्हादंडधिकारी कोल्हापूर यांना विनंती आहे की, आपण शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असताना एखादा शून्य प्रदूषणाखाली कार्यान्वीत होणारा प्रकल जर १०० टक्के आपण त्याचे प्रदूषण रोखू शकतो हे आपणसुध्दा १०० टक्के खात्रीने आमच्यासारख्या अडाणी माणसला सांगू शकाल का, आमच्या प्रकल्पाबद्दल शंका आहेत व बिद्री भागातील नागरिकांचा तिव्र विरोध आहे. मी जानेवारी २०१५ मध्ये या कारखान्याच्या प्रदूषणाबाबत तक्रार केली होती. पंचगंगा प्रदूषण समितीने या कारखान्याचा औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कमकुवत आहे, बगॅस पार्टीकल हवेमध्ये पसरत आहेत, तसेच कारखान्याचे सांडपाणी, रसायनयुक्त पाणी, मळी ओढे व नाल्या याव्दारे नदीमध्ये मिसळले जाते अशी तक्रार केली होती. १० साखर कारखान्याचे प्रदूषण व एका आसवणींचे प्रदूषण हे समान आहे. असे असताना जर शुन्य प्रदूषण होत असेल तर गेल्या गळीत हंगामामध्ये म.प्र.नि. मंडळाने कोल्हापूर जिल्हयातील १० साखर कारखान्यांची बँक हमी जप्त केली तसेच सांगली जिल्हयातील एका साखर कारखान्याची बँक हमी जप्त केली. त्यामुळे आमच्यासारख्या सर्व सामान्य लोकांनी आपल्या प्रदूषण विरहीत प्रकल्पाबाबत विश्वास कसा ठेवायचा. त्यामुळे आपल्या प्रस्तावित आसवणी प्रकल्पाला व वाढीव गाळप प्रकल्पाला माझ्यासारख्या सर्वसामान्य नागरिकाचा विरोध आहे. आम्ही जर आपल्या प्रकल्पाला मंजूरी दिली, जरी ५५ लाखाचा ई.एस.पी. कारख्यान्याच्या ८० मिटर चिमणीला बसविली तरीसुध्दा राखेचे प्रदूषण होईल. राखेचे कण आमच्या जेवणामध्ये पडतात एवढी वाईट अवस्था आहे. आम्ही वेळोवेळी हे प्रशासनास सांगण्याचा प्रयत्न करत आहोत पण कारखाना प्रशासन गेंड्याच्या कातडीसारखे वागते. फक्त एखादा प्रकल्प करायचा झाला तर बिद्री गावच्या ग्रामस्थांना, ग्रामपंचायतीला चार शब्द गोड बोलून वेळे निभाऊन नेतात असा आता पर्यंतचा इतिहास आहे. श्री. घुगरे यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत चांगल्या प्रकारे सादरीकरण केले, कुठलेही प्रदूषण होणार नाही असे सांगितले आहे. परंतु इथुन मागचा अनुभव बघता सन २०१५ पासून आजपर्यंत चार वर्षात कोणत्याही प्रकारची कारखान्याने ऊपाययोजना केलेली नाही. त्यामुळे हा प्रकल्प काल्पनिक आहे असे माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाला वाटते. त्यामुळे श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी आणि श्री. भाऊसाहेब गलांडे, अपर जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून दखल घ्यावी. साखर कारखाना आम्हाला पिण्याचे पाणी पुरवितो पण ते खूप अशुध्द आहे. प्रदूषणामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे त्यामुळे माझा या प्रकल्पाला विरोध आहे.

**उत्तर –**

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सांगितले की, आपण सांगितल्याप्रमाणे साखर कारखान्याचा बगॅस, राख पडते हे चुकीचे नाही. हे प्रश्न सोडविण्यासाठी एक कमिटी स्थापन करुन त्यामध्ये म.प्र.नि. मंडळाचे, साखर कारखान्याचे व जनतेचे प्रतिनिधी तसेच ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी व मी स्वत: मॉनिटरींग करु. आपण सूचवाल त्या दिवशी या कमीटीची बैठक घेवू व त्यामध्ये मॉनिटरींग रिपोर्टची चर्चा करु. प्रकल्प झाल्यानंतर आम्हाला सहा महिन्यांचे मॉनिटरींग रिपोर्ट वने व पर्यावरण मंत्रालयाचे प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करावे लागतात. त्यामुळे येत्या हंगामामध्ये आपण मॉनिटरींग करुन माहिती संकलन करु. केवळ खर्चीक प्रदूषण नियंत्रण यंत्रणा केवळ बसवून चालत नाही तर ती चालवावी लागते. त्यांच्या मानसिकतेमध्ये

बदल करण्यासाठी दबाव वाढविला पाहिजे. दुसरी गोष्ट, शुन्य प्रदूषण होणार असे मी म्हंटले नाही, शुन्य विसर्ग असे म्हंटले आहे. तिसरे, आपण एक दिवस द्यावा मी आपणांस ७५ केएलपीडीचे अशा प्रकारचे दोन आसवणी प्रकल्प दाखवतो व त्यावेळी आपणांस प्रश्न असतील तर ते आम्हाला विचारा आपल्या प्रश्नांचे समाधान केले जाईल. या आधी कारखान्याला आपले प्रश्न मिळाले असतील परंतु त्यांनी ते मला दाखविले नाही. देशाचे भवितव्य, प्रगती व्हावी तसेच आपल्याला त्रास होऊ नये हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन प्रकल्प उभारणी करणेची आहे.

**प्रश्न क्र. ६. श्री. भागवत महादेव वारके, गाव बोरवडे, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

आता ज्या शंका, प्रश्न उपस्थित केले गेलेत ते योग्यच आहेत, किती रुपये मिळणार हे महत्वाचे नाही तर कित्येक वर्षे प्रदूषणाचा प्रश्न आहे त्यावर भर द्यावा, भले आम्हाला प्रति टन ऊसास १० - २० रुपये कमी मिळाले तरी चालतील पण प्रदूषण होऊ नये तरच सर्व प्रस्तावित प्रकल्पाला मान्यता देतील तसेच प्रदुषण नियंत्रण यंत्रणा कायम चालू राहिली पाहिजे व मेंटेंनन्स चालू राहिला पाहिजे. आपण सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वेळी तक्रार करायला सभासद असणार नाहीत, तक्रार करायची वेळ येऊ देवू नका, प्रदूषणाबाबत सतर्क रहा कारण सामान्य माणसाकडे आपल्या कामातून तक्रार द्यायला वेळ असणार नाही. आमचा प्रकल्पाला विरोध नाही.

**उत्तर -**

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सांगितले की, आम्ही सतत मॉनिटरींग करु, तीन महिन्यातून एकदा तरी आपण वेळ द्यावा, किमान एक पत्र तरी द्यावे की प्रकल्प चांगला चालू आहे किंवा नाही. प्रदूषण नियंत्रणाबाबत एक आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल.

**प्रश्न क्र. ७. श्री. चंद्रकांत बाजीराव पाटील, गाव वाळवे खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्पाचा एकूण खर्च ४०० कोटी रुपये आहे, त्या मानाने ऊस विकास योजना ४० – ५० लाखांची अगदी नगण्य आहे. कारखान्याचा ऊसावर आधारीत आहे पण पुढे जर ऊस मिळाला नाही तर आपण प्रकल्प कशावर करणार ? त्यामुळे ऊस विकास योजना जास्त प्रभावीपणे राबवावी. ऊस विकासासाठी जास्त निधी निश्चित करावा.

**उत्तर –**

श्री. के. पी. पाटील, अध्यक्ष, मे. श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर यांनी सांगितले की, ऊस विकासाची योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याबद्दलची आपली सूचना ही आम्हाला मान्य आहे. त्या संदर्भामध्ये ऊस वाढीच्या संदर्भामध्ये पहिल्या पासून विशेषत: आपल्या विभागात अतिरिक्त पाण्यामुळे ऊसाचे उत्पादन कमी होते हे खरे आहे. आणि अलिकडे शासनाने १०० टक्के अनुदान ठिबक सिंचनला देण्याची घोषणा केलेली आहे. या गोष्टीची १०० टक्के अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ. आपणांस माहिती आहे की गेल्यावेळी आपल्या व्यवस्थापनाने निवडणुकीनंतर १० हजार रुपये संच देणेसाठी मान्य केले होते. पण प्रतिसाद मात्र खूप कमी आहे. अजुनसुध्दा

पारंपारिक पध्दतीने ऊस लागवड करण्याची पध्दत आपल्याकडे आहे. आपल्याकडे आडसाली ऊस लावण्याचे प्रयोग करण्यासाठी प्रवृत्त केले त्यालासुध्दा शेतकरी साथ कमी देतात. पण शेतक-यामध्ये जागरुकता निर्माण करुन व्यक्तीगत ऊसाचे उत्पादन वाढल्याशिवाय ख-या अर्थाने शेतक-याच्या पदरात आपण म्हणतो त्याप्रमाणे उत्पादन मिळणार नाही. निरनिराळ्या साखर कारखान्यामध्ये राबविण्यात येणा-या ऊस विकास योजनेची माहिती एकत्र करुन त्या बद्दल लोकांमध्ये जागरुकता आणणे, त्याची अंमलबजावणी जास्तीतजास्त करण्यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्नशील राहू. प्रकल्पाबाबत मी अतिशय नम्रपणे सांगतो की, जुन्या काळामध्ये आमचाच कारखाना नाही तर अनेक कारखान्यांचा मोठया प्रमाणावर सांडपाण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. अलिकडील २-४ वर्षामध्ये ऊसातून निघणारे पाणी हे १०० टक्के कारखान्याला वापरायचे असा नियम आहे. बाहेरील एक लिटरसुध्दा पाणी वापरायचे नाही अशा पध्दतीचे तंत्रज्ञान आलेले आहे. नव्या कारखान्यांमध्ये असे तंत्रज्ञान बसवण्यात आलेले आहेत व जुन्या कारखान्यांमध्ये आवश्यक ते बदल करुन वाटचाल करण्याचा निर्णय घेतलेला असून याबाबत सभासदांना आश्वासीत करणे गरजेचे आहे की, आम्ही १०० टक्के ऊसापासून मिळणा-या पाण्यावर हा कारखाना चालविणार आहोत. त्यामुळे आता जे प्रदूषीत सांडपाणी ओढ्याला जाते, प्रदूषण होते तसे काही होणार नाही. कारखान्याच्या जुन्या यंत्रणेमध्ये आम्ही बदल करणार आहोत. त्यामुळे जुन्या काळामध्ये आम्ही आसवणी प्रकल्प केला नव्हता. त्या काळामध्ये शुन्य निर्गत यंत्रणा भारतामध्ये अस्तित्वात नव्हती. आता प्रगत तंत्रज्ञान वापरुन आसवणीप्रकल्प चालू झाले. त्यामधून प्रदूषण खूप कमी होते. अजीबात प्रदूषण होणार नाही असा दावा मी करत नाही. प्रदूषण टाळण्यासाठी आमचे प्रशासन निश्चितपणे आपल्या भावना लक्षात घेईल. भूमीपुत्रांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेऊ. प्रस्तावित प्रकल्पाला मान्यता द्यावी अशी मी अतिशय नम्रपणे विनंती करतो कारण याचे भवितव्य फार मोठे आहे. जर हा कारखाना उभा राहिला तर महाराष्ट्रीत एक चांगला, दर्जेदार कारखाना ठरेल. सहवीज निर्मिती प्रकल्प उभा करतानासुध्दा आपणांस खूप त्रास झाला, अडचणी आल्या, लोकांमध्ये खूप गैरसमज होते, त्या काळातील व्यवस्थापनावर खूप टिका टिप्पणी झाली. आम्ही सहवीज निर्मिती तंत्रज्ञान बसविले असून प्रकल्प राज्यामध्ये उत्तमरितीने चालू आहे. इथेनॉल हा प्रकल्प अतिशय महत्वाकांक्षी आहे व कायमपणे उत्तम मार्केट देणार आहे. त्यामुळे या साखर कारखान्याला, या परिसराला आणि सभासदांना चांगला दर देऊ शकू. जुन्या काळातील त्रुटी दूर करण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु. आपण जी मते मांडली त्यांचे आम्ही स्वागत करतो. राखेबाबत इ.एस.पी. ऊपाययोजना केलेली आहे, यावर्षी राख मर्यादेमध्ये बाहेर पडेल असा प्रयत्न आम्ही केला आहे. हा आपला सर्वांचा प्रकल्प आहे, बिद्री गावाच्या त्यागातून कारखाना केला आहे. कारखान्याने या परिसराती २१८ गावांचा चेहरा मोहरा बदलेला आहे, हजारो छोटे मोठे उद्योग उभे राहिले आहेत. प्रस्तावित प्रकल्पामुळे हा परिसर वैभवशाली होणार आहे. बिद्रीकरांनी या प्रकल्पाला विनाविलंब मान्यता द्यावी अशी आग्रहाची व कळकळीची विनंती करतो.

**प्रश्न क्र. ८. श्री. दयानंद कांबळे, गाव ब्रिदी, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

श्री. शहाजी गायकवाड यांनी चांगले मुद्दे उपस्थित केले. भविष्यामध्ये होणा-या चुकाबाबत आजच आपण काळजी घेऊन प्रकल्प उभा करावा. प्रकल्पास आमचा अजिबात विरोध नाही. पण प्रकल्प उभा होत असताना ज्या प्रदूषणाच्या बाबी आहेत त्या आम्हाला त्रासदायक ठरणार आहेत. कारण आम्ही प्रत्येकवेळी कारखान्याचे कारखान्याचे कार्यकारी संचालक यांचेकडे येऊन बगॅस पडते, राख पडते, काळे पाणी ओढ्यामार्फत नदीत मिसळते अशा अनेक तक्रारी करीत असतो. या सगळ्यांचा विचार करुन बिलकुल प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यावी अशी माझी विनंती

आहे. दुसरा मुद्दा, प्रकल्पामध्ये जे नवे तंत्रज्ञान आपण बसविणार आहेत ते बसवितेवेळी कारखान्याचे पाच प्रतिनिधी आमच्या गावाचे पाच सदस्य एकत्र येऊन करार करु व त्या करारामध्ये मशिनरी बसविल्यामुळे प्रदूषण होणार नाही याबाबत कमिटमेंट करु. त्यामुळे प्रदूषण बिलकूल होणार नाही हे गावाला समजेल. याची निगराणी, काळजी भविष्यात होणारच आहे. पण यंत्रणा बसविल्यानंतर गावामध्ये या प्रकल्पाला विरोध होणार नाही अशी माझी खात्री आहे. त्याचबरोबर ब-याच वर्षापासून बिद्री गावातील लोकांना कारखान्यामध्ये कुठलीही रोजगाराची संधी मिळालेली नाही, ते आजपर्यंत रोजंदारीवरच काम करीत आहेत, त्यांना कारखान्यामध्ये काम करण्याची संधी मिळावी अशी आमची अपेक्षा आहे. प्रकल्प उभारण्यास आमची सहमती आहे. आमचे सर्व प्रश्न निकाली काढावे.

उत्तर –

श्री. के. पी. पाटील, अध्यक्ष, मे. श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर यांनी सांगितले की, सरपंचानी ज्या गोष्टी सांगितल्या त्या ख-या आहेत व आपल्या मताशी मी सहमत आहे. गेल्या २० – २५ वर्षांत या साखर कारखान्यामध्ये तांत्रिक व्यक्ती, अधिकारी सोडून एकही नोकर भरलेला नाही. विशेषत: मी गेली १७ वर्षे या साखर कारखान्याचा चेअरमन आहे व या १७ वर्षात भरती झालेली नाही, रिटायरमेंट खूप आहे. आता आपल्याला नोकर भरती करावी लागणार आहे व आम्ही पब्लीकली जनरल बॉडीमध्ये सांगितले आहे की, आम्ही नोकर भरती करणार आहोत. जुन्या काळात पिण्याच्या पाण्याच्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत होत्या, अनेक गावामध्ये दूषीत पाणी नेहमीच पिण्यास मिळत होते, आजही मिळते म्हणून आम्ही पाणी शुध्दीकरणाच्या प्रकल्पाची ऑर्डर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या शासनाच्या अधिकृत कंत्राटदाराला दिली आहे व तो येत्या कांही दिवसांमध्ये कार्यान्वीत होणार आहे व तो पाणी प्रकल्प कारखाना व बिद्री गांव यांच्यासाठी आपल्या आग्रही मागणीस्तव करणार आहे. आम्ही सकारात्मक आहोत. आपण सर्वजन मिळून या उद्योग वाढीसाठी प्रयत्न करु या, मी आवाहन करतो हा प्रकल्प खूप चांगला व कारखान्याला पुढे घेऊन जाणारा आहे, प्रकल्पाच्या त्रुटी, अडचणी दूर करु .

**प्रश्न क्र. ९. श्री. शहाजी पांडूरंग गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्य, गाव बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर.**

आपण स्पेंट वॉश साठवणूक करणारा टँक कशापासून बनविणार ? बिद्री गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांनी गावसभा आयोजित करुन किंवा दवंडी पेटऊन ग्रामस्थांना या जनसुनावणीस बोलावण्याची संधी होती, जनतेला विश्वासात घेणे आवश्यक होते.

उत्तर -

प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी स्पेंट वॉश साठवणूक करणारा टँक आर.सी.सी. चा बनविला जाणार आहे तसेच त्याला इपॉक्झी कोटींग केले जाईल आणि तो फक्त तीन दिवस क्षमतेचा स्टोरेज टँक असणार आहे असे सांगितले.

**प्रश्न क्र. १०. श्री. आण्णासो पोवार, गाव बिद्री, ता कागल, जि. कोल्हापूर.**

सरपंचानी सांगितल्याप्रमाणे पारदर्शक समिती नेमावी व जे काही घडेल त्याची जनतेला माहिती द्यावी अशी माझी मा. अध्यक्षांना विनंती आहे.

**प्रश्न क्र. ११. श्री. सुनिल मारुती पाटील, ऊस उत्पादक सभासद, गाव बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर .**

कारखान्याच्या अध्यक्षांनी आताच बिद्री गावासाठी ऑनलाईन फिल्टर मंजूर केल्याचे सांगितले त्या बद्दल बिद्री ग्रामस्थांच्यावतीने मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या परिसरातील २१८ गावांची प्रगती होईल असे सांगितले पण बिद्री गावचा सर्वाधिक विकास करावा ही अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री. के. पी. पाटील, अध्यक्ष, मे. श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाच्या कामकाजाबद्दल योग्य ती दक्षता घेण्यासाठी एक अभ्यासू समिती नेमण्याचा निर्णय कारखान्याच्या संचालक मंडळाने घेतलेला आहे, त्यामध्ये बिद्री ग्रामपंचायतीमधील सदस्य, पर्यावरण विषयक माहिती असणारे तज्ञ, कारखाना व्यवस्थापनामधील अधिकारी यांचा समावेश असेल.

वरील चर्चेनंतर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. श्री. भाऊसाहेब गलांडे शिंदे यांनी आजच्या जनसुनावणीमध्ये सर्वांना आपली मते मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आलेली आहे व अनेक लोकांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. आपण आपले जे मत व्यक्त केलेले आहे त्याची आहे तशी जनसुनावणी समितीमार्फत नोंद घेऊन इतिवृत्त तसेच आपण लेखी निवेदने केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयास सादर केले जाईल असे सांगितले. यानंतर मा. अध्यक्षांनी सर्व नागरीकांनी शांततेमध्ये आपली मते मांडली व पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीस पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार मानून जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या पाच हरकतींच्या प्रति सोबत जोडलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| (प्रशांत गायकवाड) | (रविंद्र आंधळे) 22/11/2012 | (भाऊसाहेब गलांडे) |
| **समन्वयक** | **सदस्य** | **अध्यक्ष** |
| **तथा** | **तथा** | **तथा** |
| **उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर** | **प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर** | **अपर जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर** |